# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७१८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३१/१०/२०१६

**१) ज्वेलर्स दुकानाचा शटर्सचा ताला तोडुन आत प्रवेश करुन दुकानातील सामानाची चोरी . :-**

दिनांक २९/१०/२०१६ चे १९.०० ते ३०/१०/२०१६ चे ०७.०० वा. दर. यातील फिर्यादी रमेश सिहासन वर्मा वय ३३ वर्ष, रा. नाका डोंगरी हे स्वत:चे मॉ. ज्वेलर्स दुकान नाकाडोंगरी येथील दि.२९/१०/२०१६ चे १९.०० वा. बंद केले. व दि. ३०/१०/२०१६ ला ०७.०० वा. दर. शेजारील गादी रजई चे दुकान दाराने दुकानाचे शटर्स उघडे असल्याचे सांगीतले वरुन फिर्यादीने जावुन पाहीले असता दुकानाचे शटर्सचे दोन्ही लॉक तोडुन दुकानातील कॉऊन्टरचे काच उचलुन शोकेस मध्ये ठेवलेले चांदीचे:- ३ नग मोठे सिक्के, ५ नग लहान सिक्के, लेडीज अंगठया १५ नग, ६ नग अंगठया, १ गणेश मुर्ती, १ गोफ, ४० ग्रॅम घुंगरु, सोन्याचे बेसर १० नग, बेन्टेक्स चे १० पटटे असा एकुण १,१७,७००/-रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने आत प्रवेश करुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**२) प्रवासी भरण्याचे कारणावरुन ढकलढकुल करुन हातोडीने मारुन जखमी केले . :-**

दिनांक २९/१०/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील फिर्यादी प्रकाश रमेश शिवनकर वय २७ वर्ष, रा. पिपंळगाव/सडक हा मधु दोनोडे यांचे पानठेल्यावर खर्रा घेण्यास गेला असता यातील आरोपीने दि. २८/१०/२०१६ ला फिर्यादी सोबत साकोली येथे प्रवासी भरण्याचे कारणा वरुन झालेल्या भांडणा वरुन पुन्हा दि. २९/१०/२०१६ ला त्याच कारणा वरुन तोंडा तोंडी भांडण केले व फिर्यादीस ढकलढकुकल करुन रागाचे भरात लोखंडी हातोडीने फिर्यादीचे डावे कानावर मारुन जखमी केले त्यामुळे फिर्यादी हा खाली रोडवर पळुन त्याचे उजवे खांदयाला मार लागल्याने फिर्यादीचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरुन पाटीने मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिली. :-**

दिनांक २९/१०/२०१६ रोजी १९.३० वा. दर. यातील फिर्यादी शैलेश ताराचंद शामकुवर वय २६ वर्ष, रा. कवळसी हा कामावरुन पिपरी पु. येथे आला असता आरोपी हा तेथे हजर होता आरोपीने फिर्यादीस जवळ बोलावुन तु येथे काय करतोस घरी तांदुळ, किराणा आणत नाही असे म्हणुन खर्रा घोटण्याच्या पाटीने डोक्यावर मारुन जखमी करुन जिवाने मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) चाकुचा धाक दाखवुन धमकवतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ३०/१०/२०१६ रोजी ०८.३० वा. दर. यातील आरोपी हा हातात बेकायदेशीर रित्या नॉनचाकु, धारदार गुप्ती अंदाजे कि. ७०/-रु. ची घेवुन लोकांना धमकावतांना, फिरतांना मिळुन आल्याने व मा. जिल्हादंडाधिकारी भंडारा यांचे कलम ३७(१)(३) मपोका आदेशाचे उल्लघंन केल्याने पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. चौधरी पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) अश्लिल शब्दात शिविगाळ करुन डोक्यावर मारुन जखमी केले. :-**

दिनांक ३०/१०/२०१६ रोजी ०८.०० वा. दर. यातील आरोपी हा फिर्यादीचा भासरा असुण एकाच घरी वेगवेगळया कम-यात राहतात फिर्यादी ही सडासारवण करीत असतांना यातील आरोपी हा दारुपाणी पिऊन काही कारण नसतांना फिर्यादीस अश्लिल शब्दात शिविगाळ करुण भांडण करुन बाजेच्या लाकडी गातानी डोक्यावर मारहाण केली तेव्हा फिर्यादीचे पतीने आरोपीस हटकले असता त्याचेपण डोक्यावर मारुन लाथाबुक्यांनी मारपीट केली व जिवाने मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६,३२३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

६) अवैध दारु अडयांवर धाडी . :–

दिनांक ३०/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. करडी व लाखांदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ०५ लिटर हातभट्टी +सडवा साहित्य कि. ७,१००/–रू. तसेच ९०० मिली देशी दारु कि. २,५०/–रु. तसेच असा एकुण कि. ७,३५०/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.